# साहित्य व्यवहाराची ‘ऑनलाइन’ झेप

## ग्रामीण भागांतूनही ऑनलाइन मागणी वाढली

Chinmay.Patankar
@timesgroup.com

**पुणे :** सध्या वाचनसंस्कृती लोप पावत असल्याची ओरड केली जात असताना ऑनलाइन पुस्तक खरेदीच्या माध्यमातून साहित्य व्यवहाराच्या कक्षा रुंदावत असल्याचे चित्र आहे. ऑनलाइन खरेदीचे प्रमाण दर तीन महिन्यांनी दुप्पट होत आहे. शहरांप्रमाणेच ग्रामीण भागातूनही ऑनलाइन खरेदीचे प्रमाण वाढत असून, ऑनलाइन सेवा साहित्य व्यवहारासाठी फायदेशीर ठरत असल्याचे चित्र आहे.



मराठी साहित्य व्यवहारात बुकगंगा डॉट कॉमने ऑनलाइन पुस्तके उपलब्ध करून दिली. त्यानंतर ॲमेझॉनसारख्या बहुराष्ट्रीय कंपनीनेही वेबसाइटवर मराठी पुस्तकांना स्थान दिले. त्यामुळे मराठी पुस्तकांची ऑनलाइन खरेदी वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे. ॲमेझॉनने नुकत्याच केलेल्या पाहणीतही मराठी पुस्तकांना ऑनलाइन मागणी वाढत असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर, मराठी साहित्य व्यवहारात ऑनलाइन खरेदी महत्त्वाची ठरू लागली आहे.

### पायरसीचा धोका

मोबाइल ॲप्लिकेशन करताना ‘ई-बुक’ची पायरसी होण्याचा धोका असतो. त्यामुळे प्रकाशकांनी ॲप्लिकेशन करताना त्याचा विचार करायला हवा, असेही जोगळेकर यांनी नमूद केले. ई-बुक तयार करताना ती स्वत:चा फॉरमॅट वापरून केलेली असावीत, कॉपी प्रोटेक्टेड पुस्तके केली पाहिजेत, असेही त्यांनी सांगितले. बुकगंगाने आतापर्यंत पंधरा हजार ई बुक केली असून, येत्या काळात ही संख्या अजून वाढणार आहे.

**‘ ऑनलाइन पुस्तक खरेदीची मागणी हळूहळू वाढते आहे. मात्र, अजूनही पुस्तक खरेदीची पारंपरिक पद्धतच प्रचलित आहे. तंत्रज्ञानाचा रेटा बघता ही परिस्थिती अचानकपणे बदलणार नाही. मात्र, तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठी सर्वांनी तयार राहायला हवे.**

**- डॉ. सदानंद बोरसे, संपादक संचालक, राजहंस प्रकाशन**

### निमित्त संमेलनाचे

ऑनलाइन व्यवहाराविषयी ‘बुकगंगा डॉट कॉम’चे संचालक मंदार जोगळेकर यांनी माहिती दिली. ‘शहरांप्रमाणेच ग्रामीण भागातही मोठा वाचक वर्ग आहे. आजतागायत त्यांच्यापर्यंत पुस्तके पोहोचलीच नव्हती. मात्र, पुस्तके ऑनलाइन मिळू लागल्याने ती उणीव दूर झाली आहे. गडचिरोलीसारख्या दुर्गम भागातूनही पुस्तकांची मागणी ऑनलाइन केली जाते. तसेच फोनबुकिंगही करण्यात येते. ऑनलाइन व्यवहार करताना ग्राहकसेवा महत्त्वाची असते. कॅश ऑन डिलिव्हरीसारखे पर्याय असल्याने शहरांतही पुस्तके ऑनलाइन मागवली जातात,’ असे जोगळेकर यांनी सांगितले.

ऑनलाइन खरेदी करणाऱ्या ग्राहकांचे प्रमाण दर तीन महिन्यांनी दुप्पट होत असल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदवले. पुढील पाच वर्षांत प्रत्यक्ष दुकानांत जाऊन पुस्तक खरेदीचे प्रमाण अधिक कमी होणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.